*मुद्रा यशोगाथा*
*नाव :- श्री. साकीर शाह, नागपाडा, मुंबई*
*व्यवसाय :- पायपुसणी (Doormat) बनविण्याचा कारखाना*

*लाभार्थ्याचे मनोगत :- मी पायपुसणी व कापडाच्या चिंधी विकण्याचा धंदा करीत असे. मला टाकाऊ वस्तुंपासून पायपुसणी बनविण्याचा उद्योग सुरु करावयाचा होता, पण भांडवलाअभावी मी करु शकत नव्हतो. बँक ऑफ इंडियाच्या नागपाडा शाखेचे प्रमुख श्री. राजू साहेब यांनी पंतप्रधान मुद्रा योजनेची माहिती सांगून कर्जाचा अर्ज दिला. तो संपूर्ण भरण्यासाठी मदत केली. मला रुपये २ लाख इतके कर्ज मंजूर झाले. मला आनंद होतो की, मी आज माझ्याबरोबर आणखी ५ जणांचे पोट भरतो. माझ्या धंदयाला चांगला प्रतिसाद मिळत असून, मी माझा कारखाना, दारुखाना येथे सुरु केला आहे. व विक्री नागपाडा येथे करतो. माझे उत्पन्न वाढले असून मी बँकेचे कर्ज परतफेड करण्यास सुरुवात केली आहे. यापुढे माझ्या धंदयात आणखी प्रगती करण्याची माझ्यामध्ये प्रेरणा आली आहे.*

-----------